# महाराष्ट्रविद्युतनियामक आयोग

१३ वा मजला, केंद्रक्र. १, जागतिक व्यापारकेंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
दूरध्वनीः ०२२-२२१६ ३९६४/२२१६३९६५, फॅक्सः २२१६३९७६
ई-मेल:mercindia@merc.gov.in
वेब-साईटः www.merc.gov.in


## जाहीर सूचना

### सत्यशोधन समितीच्या अहवालावर अभिप्राय मागविण्याबाबत

जाहिरात क्र. : ९ / २०१९-२०

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने मुंबई आणि मुंबई उपनगरातील वाढीव देयकांमुळे ग्राहकांमध्ये निर्माण झालेल्या असंतोषामागील कारणे शोधून काढण्यासाठी दि. १० डिसेंबर, २०१८ च्या अधिसूचनेन्वये सत्यशोधन समिती गठीत केली होती.

सत्यशोधन समितीने दि. २८ जून, २०१९ रोजी आपला अहवाल सादर केला आहे. हा अहवाल आयोगाच्या www.merc.gov.in या संकेत-स्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे. या अहवालावर वितरण परवानाधारकांकडून आलेले अभिप्राय देखील आयोगाच्या संकेत-स्थळावर ठेवण्यात आले आहेत. सदर अहवालावर कोणताही निर्णय घेण्यापूर्वी, आयोगास जनतेकडून त्यावर लेखी अभिप्राय मागविणे योग्य वाटते.

त्यानुसार, आयोग 'सत्यशोधन समितीचा अहवाल आणि वितरण परवानाधारकांनी सादर केलेले त्यावरील अभिप्राय' यावरलेखी अभिप्राय, सूचना आणि/किंवा हरकती मागवित असून, त्या ६ (१+५) प्रतींमध्ये, आयोगाचे सचिव यांना, मविनिआ, १३ वा मजला, केंद्र क्र.१, जागतिक व्यापारकेंद्र, कफ परेड, मुंबई ४००००५, येथेव्यक्तिशः किंवा पोस्टाने, किंवा फॅक्स किंवा ई-मेल (फॅक्सः०२२-२२१६३९७६, ई-मेलः mercindia@merc.gov.in) द्वाराकृपया पाठविण्यात याव्यात.

दिनांक ११ सप्टेंबर, २०१९ रोजी किंवा त्यापूर्वी प्राप्त होणारे सर्व अभिप्राय, सूचना आणि हरकती आयोगा कडून विचारात घेण्यात येतील.

मुंबई,
दिनांक : २८ ऑगस्ट, २०१९

सचिव, मविनिआ